**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 12 No.3** **Jan-Feb 2025**

# पर्यावरणीय न्याय आणि भारतातील सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास

**डॉ. सुनिता ज्ञानदेव बनकर**
सहा. प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगाव. ता. दौंड. जि. पुणे
**Corresponding Author: डॉ. सुनिता ज्ञानदेव बनकर**
**Email: -** sunita.bankar2589@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15111734**

**गोषवारा-**

सदर शोध निबंध भारतातील बहुआयामी सामाजिक आणि आर्थिक आव्हानांचा अभ्यास करण्यास मदत करतो. जातीभेद, लिंग असमानता, गरिबी, बेरोजगारी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यासारख्या घटकांचा राष्ट्राच्या विकासावर काय परिणाम होतो हे अभ्यासले आहे. या समस्यांच्या स्वरूपाचा अभ्यास करताना त्यांचे परस्पर संबंध विचारात घेतले आहे. सध्याची सरकारी धोरणे आणि त्यांचा प्रभाव तपासण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास साधण्यासाठी सामाजिक व आर्थिक समस्यांवर काय उपाय योजण्यात येऊ शकतात, यावरही सदर शोधनिबंध प्रकाश टाकतो. सामाजिक न्याय, आर्थिक सबलीकरण आणि पर्यावरणीय स्थिरता देशाच्या विकासासाठी आवश्यक असते. शिक्षणाची गुणवत्ता, पर्यावरण, आरोग्य, आर्थिक समानता, महिला सबलीकरण, भौगोलिक असमानतेवर मात करत आर्थिक समानता घडून आणणे या सर्व गोष्टींची आवश्यकता असते. वैयक्तिक स्वरूपातील समस्या न सोडवताना आल्याने सामाजिक समस्यांमध्ये वाढ होताना दिसून येते व याचा परिणाम समाजावर आणि पर्यायाने राष्ट्रावर होत असतो. जातीव्यवस्था आणि सामाजिक स्तरीकरण हे देखील सामाजिक समस्येचे मूळ असल्याचे आढळते. थोडक्यात सामाजिक आणि आर्थिक समस्यांचा विचारपूर्वक मेळ घालून त्यावर योग्य वेळी उपाययोजना केल्याने स्थिर आणि दीर्घकालीन सकारात्मक परिणाम देशाच्या विकासावर होणार आहेत. अनेक अर्थव्यवस्थांमध्ये रोजगार कमी असून देखील महागाईत वाढ होत आहे, ज्यामुळे धोरण कर्त्यांना सार्वजनिक खर्च करताना निवडीचा प्रश्न भेडसावतो. त्यासाठी अनेक पातळयावर मजबूत धोरणात्मक प्रयत्नाची आवश्यकता असते. समाजातील सर्व वर्गांना पूरक असलेल्या राष्ट्रीय धोरणांना देश विशिष्ट परिस्थितीनुसार अधिक अनुकूल व चांगले लक्ष्य करणे आवशक असते . कोविड-१९ च्या नंतरच्या जागतिक अर्थव्यवस्थेत धोरणकर्ते दीर्घकालीन विकासाला कसे चालना चालना देऊ शकतील याचा विचार होणे आवश्यक आहे.

**मुखशब्द -** सामाजिक ,आर्थिक आव्हान,समानता ,पर्यावरण,संधी, वांशिक भेदभाव, धोरणे, आरोग्य सेवा

**प्रस्तावना -**

भारतिय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. २०२७ पर्यंत भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी पर्यंत ही अर्थव्यवस्था उच्च मध्यम उत्पन्नाच्या स्थितीपर्यंत पोहोचण्याच्या मार्गावर आहे. अत्यंत गरिबीत जगणाऱ्या लोकसंख्येचा वाटा २०११ ते २०१९ दरम्यान कमी करण्यात भारत यशस्वी ठरला असला तरी कोविड १९ महामारीच्या काळात  हा वेग मंदावला.  दोन दशकात गिनी इंडेक्स ३५ च्या आसपास असून बालकांचे कुपोषण, नोकऱ्यांच्या गुणवत्तेबद्दल होणारी घट उपभोगातील असमानता तसेच वेतनातील वास्तविक वाढ हे प्रश्न भेडसावत आहेत.  श्रमशक्ती मध्ये महिलांचा सहभाग याविषयी चिंता ही कायम आहे. यामुळे नकारात्मक परिणाम लोकसंख्येवर होताना दिसून येतात. बालगुन्हेगारी, अमली पदार्थांचे व्यसन या वैयक्तिक स्तरावरील समस्यातून सामाजिक समस्या उद्भवतात. सामूहिक समस्या ही वैयक्तिक समस्या सोडवणुकीतील अपयशातून निर्माण होत असते आणि म्हणूनच वैयक्तिक समस्यांचे मूळ शोधणे व त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. स्थानांतरणाचा मोठा परिणाम सामाजिक समस्येवर दिसून येतो. वाढता वांशिक भेदभाव व त्यामुळे निर्माण होणारे समाज संघर्ष हे संपूर्ण जगालाच भेडसावणारे सामाजिक समस्या आहे. आरोग्य, समाज माध्यमांचा परिणाम, शहरीकरण यामुळे नवीन समस्या निर्माण होताना दिसून येतात. याचा देखील विचार करून सरकारी धोरणे ठरवली गेली पाहिजे. सरकारच्या कठोर नियमांमुळे काही प्रमाणामध्ये सामाजिक संघर्ष कमी करता येऊ शकतात. आज महिला सार्वजनिक ठिकाणी नव्हे तर घरात देखील स्वतःला असुरक्षित समजत असतात त्या दृष्टीने शिक्षणातून जाणीवपूर्वक मूल्य जोपासणे आवश्यक आहे. लैंगिक समानतेचे, राष्ट्रीय एकात्मतेचे मूल्य यासाठी आवश्यक आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधिनिबंधासाठी प्राथमिक आणिउद्दिस्थ द्वितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, अहवाल,संदर्भ पुस्तके इत्यादीचा माहिती संकलनासाठी वापर केला आहे.

**उद्दिष्टे -**

१. भारतातील प्रमुख सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे विश्लेषण करणे

२. सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना वाढविणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

३. सामाजिक न्याय आर्थिक सबलीकरण आणि पर्यावरणीय स्थिरता यांना प्राधान्य देत उपाययोजना सुचविणे.

४. सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी संभाव्य घटकांचा शोध घेणे.

**गृहीतके-**

१.भारतात सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे आढळतात .

२.सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना वाढविणाऱ्या घटकांवर उपाययोजना केल्यास त्याची तीव्रता कमी होऊ शकते.

**१.भारतातील सामाजिक समस्या आणि त्यावरील उपाय -**

**१.१.जातीव्यवस्था आणि सामाजिक स्तरीकरण-**

जातीव्यवस्थेचा सामाजिक संवाद आणि संधीवरती परिणाम होत राहतात. बऱ्याचदा लोकांना जातीव्यवस्थेमुळे शिक्षण तसेच नोकरीमध्ये भेदभावाचा सामना करावा लागतो. भारताच्या बाबतीत स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सामाजिक स्तरीकरणाचे भेदभावामध्ये नकळत परिणाम झाल्याचे दिसून येतात. संसाधने आणि संधीमध्ये मर्यादित प्रवेश झाल्याने सामाजिक तणाव आणि संघर्ष निर्माण होतो.

**१.२. लैंगिक असमानता आणि महिलांचे हक्क –**

कामाच्या ठिकाणी नोकरी किंवा पदोन्नती शोधताना महिलांना अनेकदा भेदभावाचा सामना करावा लागतो. अनेक महिलांना समान कामासाठी त्यांच्या पुरुष समकक्षांपेक्षा कमी पगार दिला जातो. तंत्रज्ञान, आरोग्य सेवा व शिक्षण यासह विविध क्षेत्रात ही विषमता आढळून येते. भारताच्या जी.डी.पी मध्ये महिलांचे योगदान फक्त १७ टक्के दिसून येते जे जागतिक सरासरीच्या निम्म्याहून कमी आहे.

**१.३. लिंग आधारित हिंसा-**

लिंग आधारित हिंसा भारतातील एक गंभीर चिंतेचा विषय आहे. बलात्कार आणि हुंडा यांसारख्या महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने कायदे असूनही या भेदभाव पूर्ण प्रथा चिंताजनक पद्धतीने वाढताना दिसून येत आहेत. अनेकदा महिला सार्वजनिक ठिकाणीच नव्हे तर स्वतःच्या घरात देखील असुरक्षित असतात. समाजामध्ये स्त्रियांना रोजगारासाठी स्थानांतरणाचे स्वातंत्र्य न मिळण्याचे हे प्रमुख कारण आहे.

**१.४. आरोग्य सेवा-**

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये आरोग्य सेवा हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. विशेषत: ग्रामीण भागातील आरोग्याच्या सुविधा. ग्रामीण भागात आजही आवश्यक असलेल्या वैद्यकीय मदत मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो तर शहरी आरोग्य केंद्रात उपचाराचा खर्च उच्च असून उपलब्ध सेवांबाबत जागरूकतेचा अभाव दिसून येतो. मानसिक आरोग्य ही देखील आजच्या घडीला महत्त्वाची समस्या दिसून येते ज्याकडे भारतात बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते. प्रौढांच्या मानसिक विकारामुळे त्यांच्या आर्थिक उत्पादकतेवरती परिणाम होतो उत्पादकता कमी होते म्हणून मानसिक आरोग्य हे आर्थिक नुकसानीस कारणीभूत ठरू शकते.

**१.५. गरिबी आणि आर्थिक विषमता-**

ग्रामीण विरुद्ध शहरी गरिबी भारतात पहावयास मिळते. ग्रामीण भागात रोजगाराच्या मर्यादित संधी असतात तसेच स्वच्छता शुद्ध पाणी यासारख्या मूलभूत सुविधांची कमतरता दिसून येते. याउलट शहरात रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी दिसून येतात. शहरी भागात दारिद्र्याची झळ ग्रामीण भागापेक्षा कमी असते .नोकऱ्या आणि इतर सेवांमध्ये अधिक रोजगार दिसून येतो. थोडक्यात आर्थिक विषमता ही संधीतील फरकामुळे तसेच पायाभूत सुविधांच्या कमतरता मुळे दिसून येते आणि त्यातून गरीब श्रीमंत अशी मोठी दरी पहावयास मिळते.

**१.६. शिक्षणाची गुणवत्ता-**

भारतीय शिक्षण व्यवस्थेत लक्षणीय प्रगती केली असली तरी दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे . शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव, प्रशिक्षित शिक्षकांचा तुटवडा, आवश्यक शैक्षणिक साधनांची कमतरता, तंत्रज्ञानाचा अभाव या सर्वांमुळे शैक्षणिक गुणवत्ता कमी आढळते. शैक्षणिक प्रवेशात असमानता दिसून येते. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाचा साक्षरता दर देखील कमी आढळतो. म्हणूनच शिक्षणाची गुणवत्ता ही भारतीय समाज व्यवस्थेमध्ये असणारी एक सामाजिक समस्या आहे असे म्हणता येईल.

**१.६. पर्यावरणीय समस्या-**

वायु ,जल प्रदूषण ही प्रमुख पर्यावरणीय आव्हाने भारताच्या बाबतीत दिसून येतात. शहरात कमी होत चाललेली हवेची गुणवत्ता व त्याचे आरोग्यावर होणारे घातक परिणाम लक्षात घेता वायु प्रदूषण हे चिंतादायक बाब आहे. तसेच पाण्याचे दूषित होणारे स्रोत जलचरांच्या आरोग्यावरती विपरीत परिणाम करतात, यामुळे रोगराई वाढ होऊन आरोग्य धोक्यात येत आहे. आजारांची संख्या तसेच त्याची तीव्रता वाढत आहे. त्याचबरोबर शहरीकरणाचा वाढता प्रभाव व बेरोजगारीची समस्या हे देखील भारतीय समाजातील एक सामाजिक समस्या आहे. सोशल मीडिया प्रभाव-समाज माध्यमांचे समाजावरती सकारात्मक आणि नकारात्मक असे परिणाम दिसून येतात. त्यांनी केलेल्या टीका टिप्पणी प्रशंसा अथवा चुकीच्या बातमीमुळे समाजामध्ये गैरसमज निर्माण होऊ शकतात त्याचा परिणाम सामाजिक संघर्षामध्ये होताना दिसून येतो. त्याचबरोबर बातम्यांची विश्वासार्हता न तपासता केले जाणारे प्रक्षेपण यामुळे आजारांच्या बाबतीत भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते.

**१.२. सामाजिक समस्यावरील उपाय योजना-**

1. जातीव्यवस्था आणि सामाजिक स्तरीकरणाच्या बाबतीत सरकारी धोरणे आणि सुधारणा परिणामकारक ठरू शकतात यात जाती आधारित

विषमता कमी करण्याच्या उद्देशाने धोरणांची अंमलबजावणी केली पाहिजे.

2. लैंगिक अत्याचाराचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे.
3. बेटी बचाव बेटी पढाव उपक्रमाची व्यापकता वाढविणे. सामाजिक संघर्ष टाळण्यासाठी सरकारने काही ठिकाणी कठोर कारवाई करावी.
4. सामाजिक दृष्टिकोन बदलण्यासाठी महिलांच्या हक्कांचा आदर करण्यासाठी जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.
5. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्त्री पुरुष समानता, राष्ट्रीय ऐक्य ही मूल्य रुजविणे.
6. आर्थिक धोरणांची आखणी करत असताना विषमता दूर करण्यासाठी अधिक प्रभावी धोरणाची आवश्यकता आहे.
7. सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक पारदर्शक व्हावी. कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना माफक तसेच अनुदानित दरात आवश्यक अन्नपदार्थांचे वितरण करताना त्याचा दर्जा तपासला जावा.
8. आरोग्य सेवांच्या उपक्रमात वाढ व्हावी. त्यासाठी गुणवत्ता सुधारित कार्यक्रम अभियान त्यातील लोकसहभाग वाढवावा.
9. शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्यासाठी शिक्षणातील अनुदानांची संख्या वाढवावी.

**२.भारतातील आर्थिक समस्या -आणि संभाव्य उपाय**

**१ भारतातील आर्थिक समस्या**

भारतातील आर्थिक आव्हाने ही देशाच्या वाढ आणि विकासावर प्रभाव टाकताना दिसून येतात. कारण भारतीय अर्थव्यवस्था जगातील वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असली तरी विविध अथळयांचा सामना करावा लागत आहे व या समस्यांवर ती उपाययोजना केल्या तरच निरंतर आर्थिक वाढीसाठी मदत होणार आहे. लोकसंख्येची घनता, पायाभूत सुविधा, गरिबी, छुपी बेकारी, कमी उत्पादकता यासारख्या अडथळयांचा सामना करावा लागत आहे.

**२.१ गरिबी आणि उत्पन्न असमानता-**

भारतात गरिबी आणि उत्पन्नातील असमानता यासारख्या गंभीर स्वरूपाच्या समस्या दिसून येतात. भारतीय लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येपैकी जास्त लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील आहे. शिवाय श्रीमंत आणि गरीब ही मोठी तफावत दिसून येते आणि सामाजिक एकसंधता तसेच सर्व समावेशक वाढीसाठी ही श्रीमंत गरीब तफावत एक आव्हान ठरत आहे.

**२.२ बेरोजगारी-**

भारतीय तरुणांमध्ये सद्यस्थितीला बेरोजगारीचे एक मोठे आव्हान दिसून येते. वाढत्या श्रमशक्तीला सामावून घेण्यासाठी पुरेशा प्रमाणामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे काम सरकारकडून वेगाने होताना दिसून येत नाही.

**२.३ शेतीतील समस्या-**

कृषी संकट ही भारतातील एक गंभीर समस्या दिसून येते. कृषी क्षेत्रामध्ये छुप्या बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे . तसेच कमी उत्पादकता आधुनिकीकरणाचा अभाव, किमतीतील चढ-उतार, हवामानातील बदल यासारख्या गोष्टीमुळे शेती क्षेत्रातील संकट वाढत आहे. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने लोकसंख्येच्या महत्त्वपूर्ण भागावरती तसेच अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रावर ती मोठ्या प्रमाणात संकट ओढावताना दिसून येत आहे. कृषी क्षेत्रामध्ये सुधारित बियाणे खते आणि ट्रॅक्टर गुंतवणूकदार इत्यादींसारख्या आवश्यक गोष्टी खरेदी करू शकत नाही. त्यामुळे बहुतेक उद्योग सूक्ष्म किंवा लहान आहेत आधुनिक आणि अधिक उत्पादन क्षम तंत्रज्ञान शेती क्षेत्रामध्ये परवडत नाही व याचाच परिणाम कमी उत्पादकतेमध्ये होतो

**२.४ पायाभूत सुविधांची कमतरता –**

भारताला वाहतूक, ऊर्जा, डिजिटल नेटवर्क यामध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. कारण आर्थिक वाढीस यामुळे अडथळा निर्माण होतो. व्यवसाय कार्यात सुटसुटीतपणा राहत नाही .थोडक्यात भारतात पायाभूत सुविधांची कमतरता ही भारताच्या आर्थिक विकासातील समस्या आह

**२.५. भ्रष्टाचार आणि गैरकारभार –**

नोकरशाही वर्गामधील वाढती अकार्यक्षमता भारतात दिसून येते. भ्रष्टाचार आणि सरकारी कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार यामुळे लोकांचा शासन व्यवस्थेवर विश्वास राहिला नाही. याच अविश्वासाच्या वातावरणामुळे उद्योग व्यवसाय वाढू इच्छिणारे लोक परकीय गुंतवणुकीला प्राधान्य देतात .

**२.६. महागाई चलनवाढ-**

प्रभावी नियंत्रणासह आर्थिक वाढ संतुलित करण्याचे भारतात आव्हान निर्माण झाले आहे. अन्नधान्य तसेच इंधनाच्या किमतीतील चढउतारामुळे महागाईचा दर वाढतो आहे. लोकांच्या उत्पन्नात झालेल्या वाढीपेक्षा त्यांचा राहणीमानावर होणारा खर्च अधिक होत आहे. यामुळे बचतीचे प्रमाण कमी होताना दिसून येते व भांडवलाची कमतरता निर्माण होते .

**२.७. वित्तीय तूट आणि सार्वजनिक कर्ज -**

सार्वजनिक कर्जाचे वाढते प्रमाण तसेच वित्तीय तूट हे भारत सरकार पुढील कायमचे आव्हान आहे यामुळे महागाई वाढते आहे तर आर्थिक अस्थिरता देखील निर्माण होताना दिसून येते.

**२.८ पर्यावरणीय स्थिरता-**

जलद औद्योगीकरण शहरीकरण यामुळे पर्यावरणावर नकारात्मक परिणाम तसेच प्रभाव दिसून येतो. प्रदूषण जंगलतोड हवामान बदल ही प्रमुख आव्हाने दिसून येतात. यामुळे पर्यावरण संवर्धन राखणे गरजेचे ठरत आहे. पर्यावरण संवर्धन करत आर्थिक वाढ करणे हा देखील एक गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण होताना दिसून येतो.

**२.भारतातील आर्थिक समस्या आणि संभाव्य उपाय -**

1. देशातील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी सरकारने भारतीय पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली पाहिजे. भारताने अशा संयुक्त व्यवसाय उपक्रमांना पुरस्कार दिले पाहिजे ज्यात भारतामध्ये चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सरकार इतर व्यक्ती किंवा देशांसोबत सहकार्य करेल.
2. खाजगीकरण दरडोई उत्पन्न वाढून आर्थिक वाढीला गती मिळण्यासाठी आवश्यक आहे
3. भारताने औद्योगिक उत्पादन आणि यंत्रसामग्री वाढली पाहिजे. शेतमजुरांचा पुरवठा कमी असल्याने त्या दृष्टिकोनातून विचार करत उद्योगात आत्मसात केले पाहिजे.
4. स्वदेशी उत्पादन ही आज काळाची गरज आहे .निर्यात शुल्क कमी केल्यामुळे देशाचे दरडोई उत्पन्न वाढते त्यातून रोजगाराच्या संधीही निर्माण होतात भारतात बनवलेल्या उत्पादनांचा वापर भारताने सुरू केला पाहिजे.
5. भ्रष्टाचार विरोधी उपाययोजना केल्याने भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणारी भ्रष्टाचाराची समस्या कमी करता येईल. अर्थव्यवस्था विकसित होण्यासाठी भ्रष्टाचारावर जालीम उपाय होणे गरजेचे आहे .
6. शैक्षणिक दर्जा सुधारणे- व्यक्तींनी शिक्षणाचा स्तर वाढवून नवीन आणि विकसनशील तंत्रज्ञानाबद्दल अधिक माहिती घ्यावी व ते तंत्रज्ञान आत्मसात करावे. याचा उपयोग औद्योगिक क्षेत्रात होतो. यामुळे कृषी क्षेत्रावर रोजगाराचा ताण येणार नाही.
7. बँकिंग सेवांमध्ये प्रवेश वाढवणे- आर्थिक साक्षरतेला प्रोत्साहन देणे यामुळे भारत आर्थिक समावेशन करू शकेल.
8. निर्यातीला चालना देऊन अनावश्यक आयात कमी करून परदेशी गुंतवणूक आकर्षित करता येऊ शकते .महागाई नियंत्रित आणण्यासाठी किमती स्थिर ठेवणे व यामध्ये आर्थिक धोरणे महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**सारांश –**

एकीकडे भारत शाश्वत विकास साठी प्रयत्न करत आहे तर दुसरीकडे अजूनही कमी उत्पन्न असलेली विकसनशील अर्थव्यवस्था आहे कमी दरडोई उत्पन्न व्यतिरिक्त भारतामध्ये उत्पन्नाच्या असमान वितरणाची समस्या दिसून येते व्यवसायाचे वितरण देखील भारतीय अर्थव्यवस्थेचे मागासलेपणा दर्शविते जागतिक बँकेच्या मते२०२४मध्ये भारतातील सुमारे ४७% लोकसंख्या शेतीमध्ये गुंतलेली होती व राष्ट्रीय उत्पन्नात केवळ १७ टक्के योगदान दिले गेले . म्हणजेच प्रति व्यक्ती कमी उत्पादकता दिसून आली. भांडवल निर्मिती दरात संथ सुधारणा भारतात नेहमीच भांडवलाची कमतरता होती. अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी जे गुंतवणूक करावी लागली. याचा परिणाम भांडवलाच्या कमतरतेवर होताना दिसून येतो. भारत हा विविधतेने नटलेला समृद्ध देश आहे .परंतु त्याला अनेक सामाजिक तसेच आर्थिक आव्हानाचा सामना करावा लागतो .न्याय समाजाच्या निर्मितीसाठी या सामाजिक समस्या समजून घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ –**

१. जगजीवन काळे .,अर्थसंकल्प ,आर्यन प्रकाशन ,पुणे एप्रिल २०२३

२. रमेश सिंह .,भारतीय अर्थव्यवस्था.,MC GRAW HILL EDU.PVT,चेन्नई २०२४

३. sleepyclasses.com/social-issues-in-india

४. pw.live/exam/commerce/economic challeges-in.india.

५. किशोर गायकवाड,शरद पवार .,भारताचा आर्थिक विकास .,युनिक अकेडमी,२०२२

६. https://www.imf.org/en/Publications/WEO/Issues/2021/10/12/world-economic-outlook-october-2021